लोकमत

# गडहिंग्लजमध्ये विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करा

## शिवसेनेची मागणी : उच्चशिक्षण मंत्री उदय सामंत यांना निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : सीमाभागासह चंदगड, आजरा, गडहिंग्लज, गारगोटी व कापशी खोऱ्यातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता गडहिंग्लज येथे शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करावे, अशी मागणी शिवसेनेतर्फे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे निवेदनातून रविवारी करण्यात आली.

सीमावर्ती भागात कोणते शैक्षणिक उपक्रम राबवावेत यासाठी मंत्री सामंत हे विद्यापीठात आले होते.

### सीमाभागात आनंद

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व मंत्री सामंत यांनी सीमाभागात मराठी महाविद्यालय सुरु करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यामुळे सीमाभागातील मराठी भाषिक जनतेला मोठा आनंद झाला आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

त्यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विजय देवणे यांनी निवेदन दिले. यावेळी खासदार प्रा. संजय मंडलिक, आ. प्रकाश आबिटकर, मनजित माने, प्रतीक क्षीरसागर आदी उपस्थित होते.



कोल्हापूर येथे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांना शिवसेना जिल्हाप्रमुख विजय देवणे यांनी निवेदन दिले. यावेळी खासदार संजय मंडलिक, आमदार प्रकाश आबिटकर उपस्थित होते.

लोकमत

# महेश काकडे, अर्जुन घाटुळे यांच्यासह सहाजण मुलाखतीसाठी पात्र

## शिवाजी विद्यापीठ परीक्षा मंडळ संचालक पद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : गेल्या वर्षभरापासून थांबलेली शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदाच्या निवडीची प्रक्रिया पुन्हा सुरु झाली आहे. या पदाच्या मुलाखतीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा संचालक महेश काकडे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. अर्जुन घाटुळे यांच्यासह सहाजण पात्र ठरले आहेत. पात्र आणि अपात्र उमेदवारांची यादी विद्यापीठ प्रशासनाने मंगळवारी ऑनलाईन जाहीर केली.

परीक्षा मंडळाचे माजी संचालक महेश काकडे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने रिक्त झालेल्या पदावर नवीन संचालक निवडीची प्रक्रिया विद्यापीठाने एप्रिल २०१९ मध्ये सुरु केली. त्याअंतर्गत अर्ज मागविणारी जाहिरात दि. ९ मार्चला प्रसिद्ध झाली. त्यात दि. ५ एप्रिलपर्यंत ऑनलाईन, तर त्याची प्रत विद्यापीठाकडे जमा करण्याची अंतिम मुदत १५ एप्रिल होती. या मुदतीत एकूण १६ अर्ज दाखल झाले. छाननीची प्रक्रिया झाली. मात्र, पुढील कार्यवाही थांबली. त्यानंतर वर्षभरानंतर मंगळवारी विद्यापीठाने मुलाखतीच्या प्रक्रियेसाठी पात्र व अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली. त्यात काकडे, घाटुळे यांच्यासह सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुहास पाटील, सिंहगड इन्स्टिट्यूटमधील शिवाजी मुंडे, योगेश पाटील, सुजाता आडमुठे हे मुलाखतीसाठी पात्र ठरले आहेत. उर्वरित दहाजणांचे अर्ज अपात्र ठरले असून, त्यात विजयकुमार साळुंखे, दशरथ मगर, रामचंद्र पवार, शरद फुलारी, शिवाजी बोराडे, नामदेव मोरे, मधुरा जगताप, अंकुश शिर्के, राहुल जाधव, किशोर पांडेजी यांचा समावेश आहे.दरम्यान, प्रभारी कुलगुरुंशी चर्चा करून आणि कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर मुलाखतीची तारीख जाहीर केली जाणार असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

### आताच कशी प्रक्रिया सुरु

पूर्णवेळ कुलगुरुंचा कालावधी संपण्यास एक वर्षाचा अवधी असताना परीक्षा मंडळाच्या संचालक निवडीची प्रक्रिया सुरु झाली होती. आता कुलगुरु निवडीची प्रक्रिया सुरु असतानाच पुन्हा कशी काय या संचालक निवडीची प्रक्रिया सुरु झाली, असा प्रश्न विद्यापीठ वर्तुळातून उपस्थित होत आहे.

# शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र शिनोळीला होणार

प्रतिनिधी
चंदगड

सीमाभागातील विद्यार्थ्यांवर नेहमी अन्याय होत आला आहे. शिक्षण आणि नोकरीसाठी येथील विद्यार्थी नेहमी संघर्षाला सामोरे जातो. त्याच्यांवर नेहमी भाषिक जुलूम होत आला आहे. भाषिक कुचंबना प्रगतीतील अडथळा ठरू शकतो. म्हणून त्यांना मातृभाषेतून शिक्षण घेता यावे आणि कॅम्पस सिलेक्शनमधून नोकरीची संधी मिळावी. यासाठी सीमाभागालगत शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे, अशी मागणी केली असल्याची माहिती आमदार राजेश पाटील यांनी दिली.

त्यानुसार रविवार दि. १९ जुलै, २०२० रोजी शिवाजी विद्यापीठ येथे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्यासोबत बैठक झाली. सीमाभागातील जनतेने मराठी भाषेचा अभिमान, स्वाभिमान आणि जागर सन्मानाने तेवत ठेवला आहे. सीमावासी बांधवांना अशा शैक्षणिक संकुलाची संकल्पना शरद पवार, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मनात आहे. त्या संकल्पनेला आता मूर्त रूप मिळते आहे. या सर्वांची सीमाभागातील लोकांप्रती आदराची आणि ममत्वाची भावना आहे. महाराष्ट्रातील लोक सीमाभागातील जनतेचे देणे लागतो, अशी भावना त्यांची आहे. त्या भावनेचा साजेशे असे शैक्षणिक संकुल शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्राच्या रूपाने उभे राहते आहे. यामुळे मराठी भाषेचा जागर सीमाभागात कायम राहील. तसेच येथे आर्ट, कॉमर्स व सायन्स हे पारंपरिक शिक्षण देणे हे उद्दिष्ट न ठेवता व्यापक विचार केला आहे. या उपकेंद्रातून शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून वेगवेगळे व्यावसायिक अभ्यासक्रम चालू करणार आहोत. त्यामध्ये नॅनो सायन्स, फूड टेक्नॉलॉजी, एम. एस. डब्ल्यू, एम. बी. ए यांचा समावेश आहे. शिवाय मराठी भाषेतून लेखन वाढावे यासाठी पटकथा लेखन, रूपांतर, अनुवाद, जाहिरात लेखन, पत्रकारिता, अर्थशास्त्र, पर्यावरण, मानसशास्त्र हे विषय मराठीतून शिकवणे तसेच लोककला, ललितकला, नाट्यशास्त्र याचे शिक्षण येथे देण्याचा मानस आहे.



**आमदार राजेश पाटील यांची माहिती**

यामुळे सीमाभागातील युवक स्वतःच्या पायावर उभा राहील. सीमालगतच्या जनतेच्या अपेक्षा महाराष्ट्र शासनाकडे आहेत. त्यामुळे इथल्या शैक्षणिक समस्या जाणून घेण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांशी संवाद साधावा, यामध्ये अनेक नेते, महाराष्ट्र एकीकरण समिती, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण संस्था, अशा अनेक संस्था आहेत. यांच्याशी एक व्यापक बैठक घेण्याचे ठरले आहे. तसेच बेळगाव व खानापूर केंद्रबिंदू धरून हे उपकेंद्र चंदगडमध्ये व्हावे, असा ठराव कमिटीने केले. शिनोळी बुद्रुक, शिनोळी खुर्द व तुडये ग्रामस्थांनी हे शैक्षणिक संकुल उभा करण्यासाठी जमीन स्वेच्छेने देण्याचे ठरवले असल्याचे आमदार राजेश पाटील यांनी सांगितले.

# विद्यापीठातील चार प्राध्यापकांची प्रभारी अधिष्ठातापदी नियुक्ती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात जूनमध्ये रिक्त झालेल्या चार विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी चार प्राचार्यांची नियुक्ती केली आहे. नियुक्ती झालेल्या प्राध्यापकांवर शिक्षण क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागातील प्रा. डॉ. व्ही. जे. फुलारी यांची विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेचे प्रभारी अधिष्ठातापदी नेमणूक झाली आहे. वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागातील डॉ. अण्णासाहेब गुरव यांच्याकडे वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे प्रभारी अधिष्ठातापद सोपविले आहे. विटा येथील मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्य डॉ. एम. व्ही. गुळवणी यांची आंतरविद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठातापदी तर राधानगरी महाविद्यालयातील प्रा. डॉ. डी. एस. मोरुसकर यांची मानव्यशास्त्र शाखेच्या अधिष्ठातापदी निवड केली आहे. नियमित अधिष्ठातांच्या नेमणुका होईपर्यंत या चौघांकडे अधिष्ठातापदाचा कार्यभार राहणार आहे.



# विद्यापीठात २ विहिरींची बांधणी

## रुसांतर्गत जलसंधारणाची कामे; स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी झाले उपलब्ध

सकाळ वृत्तसेवा

**आर. के. नगर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षा उच्चतर अभियान (रुसा)अंतर्गत आलेल्या निधीमधून दोन विहिरी खोदल्या. यासाठी सुमारे ४५ लाख रुपयांचा निधी उपयोगी पडला. विद्यापीठ परिसरात केलेल्या जलसंधारण उपाययोजनांमुळे विहिरींना कमी फुटावर भरपूर पाणी लागले. आता या विहिरी काठोकाठ भरल्या असून, यामध्ये पिण्यायोग्य स्वच्छ पाणी आहे.**

एकेकाळी विद्यापीठामध्ये टँकरने पाणी आणावे लागत होते. मात्र, गेल्या पाच ते सात वर्षांत पाण्याच्या बाबतीत विद्यापीठ स्वयंपूर्ण बनले आहे. विद्यार्थ्यांना पिण्यासाठी व वापरासाठी मुबलक पाणी मिळू लागले आहे. जलसंवर्धनाच्या कामांतर्गत या परिसरात तलाव, विहिरी, चर खोदून पाणी मुरवणे असे विविध प्रयोग करण्यात आले. जुना पुणे-बेंगलोर महामार्ग ते एन.सी.सी.भवन या एकट्या परिसरातील पावसाचे पाणी जमिनीत मुरवले गेले. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली. याचा लाभ केवळ विद्यापीठालाच झाला असे नाही तर आसपासच्या उपनगरातही कूपनलिकांची पाणी पातळी वाढली. रुसा अंतर्गत आलेल्या निधीमधूनही गेल्या वर्षी दोन नव्या विहिरी बांधल्या. यातील एक विहीर राजेंद्र नगर परिसराच्या दिशेला असून, तीचा व्यास १०० फूट आणि खोली ३५ फूट इतकी आहे. दुसरी विहीर मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या बाजूला असून तिचा व्यास ५० फूट असून, खोली ४० फूट आहे.



**कोल्हापूर : रुसाच्या निधीतून विद्यापीठ परिसरात खोदलेली विहीर पाण्याने काठोकाठ भरली आहे.**

या दोन्ही विहिरींना पन्नास फुटांच्या आतच पाणी लागले. पाण्याचा साठा एवढा आहे, की उन्हाळ्यातही या विहिरी भरून वाहत असतात. पावसाळ्यात तर या विहिरी काठोकाठ भरल्या असून, पाण्याचा मोठा प्रवाह विहिरीबाहेर ओसंडत असतो. या दोन विहिरींमुळे विद्यापीठाला उन्हाळ्यात लागणारे अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे.

**विद्यापीठातील जलसंधारणांच्या कामांमुळे जलयुक्त विद्यापीठ अशी नवी ओळख विद्यापीठाला मिळाली आहे. रुसा अंतर्गत आलेल्या निधीमधून दोन नव्या विहिरींची निर्मिती झाली. यामुळे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे.**

**- प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे,**
उपकुलसचिव

### विद्यापीठाचे जलवैभव

**विहिरी**
१०
**तलाव**
२
**शेततळी**
१२
**एकूण पाणीसाठा**
३१ कोटी लिटरपेक्षा जास्त

# परीक्षा मंडळ संचालक पदासाठी ६ जण पात्र

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक पद रिक्त आहे. एप्रिल २०१९ मध्ये याची निवड प्रक्रिया सुरू झाली. मात्र, गेले वर्षभर ही प्रक्रिया ठप्प होती. आज पुन्हा प्रक्रिया सुरू झाली. आलेल्या १६ अर्जांपैकी ६ अर्ज पात्र ठरवण्यात आले. तर दहा अर्ज अपात्र ठरले. याची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. मुलाखतीसाठी निवडलेल्या ६ जणांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा संचालक महेश काकडे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक अर्जुन घाटुळे, सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुहास पाटील, सायबरचे माजी प्राध्यापक शिवाजी मुंडे, योगेश पाटील, सुजाता आडमुठे यांचा समावेश आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर मुलाखतीची तारीख जाहीर केली जाणार आहे.